**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४१६ / २००९/ सांगली | संभाजी दत्ताजी नलावडे पाटील मु.पो.वाळवा, जि.सांगली | सचिव, वाटेश्वर सहकारी, पाणी पुरवठा संस्था मर्या., वाटेगाव, ता.वाळवा, जि.सांगली | सहायक निबंधक, सहकारी संस्था, वाळवा, इस्लामपूर, जि. सांगली | संस्थेविषयी सभासद यादी, गट नं., नावासह तारण क्षेत्र, मयत सभासदांच्या वारसांची यादी, संस्थेच्या थकबाकीदारांची यादी, व ठेवीदारांची माहिती इ. | १. अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २०/२/२००९ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे.<br>२. नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थेची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आहे. ती अपिलकर्त्यांने मागितल्यास द्यावी. |
| २ | १०४८/ २००९/ सांगली | श्री.समीर शिराज शेख रा.लेंगरे, ता.खानापूर, जि.सांगली | मुख्य कर्मचारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सांगली विभाग, सांगली | चालक भरतीसाठी सर्व निकष पात्र असताना देखील का डावलले याबाबतचा | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये खुलासा मागविता येत नाही. जन माहिती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सांगली विभाग, सांगली | | खुलासा | अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. |
| ३ | १२४२/ २००९/ सांगली | शाहिर किसन आवळे राम मंदिर मिशन कपांउड, सांगली | प्रादेशिक कार्यालय, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, घोले रोड, पुणे ५ | उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, घोले रोड, पुणे ५ | आवश्यक कागदपत्रांअभावी मागणी केलेल्या महितीचा बोध होत नाही | अपीलकर्त्यांने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१. वरील तक्त्यातील एकूण ३अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र.४१६ / २००९ / सांगली, १०४८/ २००९ / सांगली, १२४२/ २००९ / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४१८/ सोलापूर | श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे २१, सिध्देश्वर नगर, विजापूर रोड, भारती विद्यापीठ जवळ, सोलापूर | आस्थापना अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर उपविभाग, सोलापूर | उपविभागीय अधिकारी, सोलापूर उपविभाग, सोलापूर | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील पोटकलम १ (ख) (एक) व १(ख) (दोन) नुसार कर्मचारी / अधिकारी यांची अद्यावत माहिती, (१) (ख) (तीन) नुसार आकारीपड जमिनीचे वाटप करणे व मूळ खातेदाराला अथवा त्यांचे वारसाला जमिन परत करण्याची कार्यपध्दती, श्री. श्रीशैल राचय्या स्वामी यांनी त्यांचे पुर्वजांची जमीन परत मिळण्याची मागणी केलेले प्रकरण कोणत्या पत्राने आपल्या कार्यालयास आले त्याची प्रत. | आवश्यक माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याचे अपीलकर्त्याचे दि. ५.८.२००९ चे निवेदन जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी दि. ७.८.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले आहे. |
| २ | ११४४/ २००९/ सोलापूर | अध्यक्ष, अश्विनी रूरल कॅन्सर रिसर्च अँड रिलीफ सोसायटी, संचालित नर्गीस दत्त मेमोरियल हॉस्पीटल, बार्शी, जि. सोलापूर | अध्यक्ष, अश्विनी रूरल कॅन्सर रिसर्च अँड रिलीफ सोसायटी, संचालित नर्गीस दत्त मेमोरियल हॉस्पिटल, बार्शी, जि . सोलापूर | सहायक धर्मादाय आयुक्त सोलापूर विभाग, सोलापूर | श्री. शहाजहान छोटुलाल शेख यांनी अध्यक्ष अश्विनी रूरल कॅन्सर रिसर्च अँड रिलीफ सोसायटी, बार्शी या संस्थेची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. सदर अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त सोलापूर यांनी दि. २४.०६.२००८ | १) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार अपील व्यक्तीच्या नावे करणे आवश्यक आहे, पदनामाने नाही. २) अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत व जोडपत्र ' क ' वर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे अपील दाखल केले आहे. | अपीलकर्त्याने स्वाक्षरी केलेली नाही. |
| ३ | १२१९/ २००९/ सोलापूर | श्री. संभाजी निवृत्ती काळे माढा रोड, कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | उपविभागीय अधिकारी कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | मौजे भोसरे माढा येथील जमीन गट नं. ४२९ चे मालक कृष्णाबाई दशरथ गोडसे या २० वर्षापुर्वी मयत झाल्या, त्यांना वारस नसल्याने त्यांची जमीन श्री विठ्ठल गणपत गोडसे वहिवाटी करतात, असे समजते.सदर जमीन वहिवाटीसाठी पूर्व परवानगी घेतली का, परवानगीसाठी अर्ज कधी केला, त्या जमीनीतील उत्पन्न कोण घेते इत्यादी माहिती. | अपिलकर्त्याची मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. सबंधित जमिनीबाबत सद्यस्थितीची माहिती उपविभागीय अधिकारी, कुर्डुवाडी यांनी १५ दिवसांत अपिलकर्त्यास द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र ४१८/ सोलापूर,११४४ /२००९ /सोलापूर व १२१९ /२००९/सोलापूर ) निकाली काढण्यात येत आहे.

२) अपील क्र १२१९/२००९ सोलापूर मध्ये निष्कर्षात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा सबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**

**दि.१८.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी दाखल केलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४२५ / सांगली | श्री.व्यंकटेश बालाजी कुलकर्णी १०, मयुर हौसिंग सोसायटी, अरवडे पार्क मागे, रेल्वे स्टेशनच्या पुर्वेस, सांगली | वैद्यकीय आरोग्य अधिकारी , सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | महानगरपालिके-च्या घंटागाडी व सफाई कामगारांविषयी-ची माहिती | अपीलकर्त्यांस त्यांच्या अर्जाप्रमाणे देय माहिती दिली असून त्यांचे अन्य मुद्दे सूचनांच्या स्वरुपाचे आहेत.ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे, ते रास्त आहे. |
| २ | १०२७ / सांगली | श्री. श्रीमंत राजाराम हुलेनवर मु.पो.कोसारी, ता.जत, जि.सांगली | मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल कोसारी, ता.जत, जि.सांगली | शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद सांगली | हजेरी पत्रकाची छायांकित प्रत व मे २००८ ते जानेवारी २००९ ची पगारपत्रके | १. अपीलकर्त्यास, माहिती दिली आहे व माहिती दि. २७.३.२००९ रोजी मिळाल्याने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या समक्ष अपिलकर्त्याने कबूल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | केले आहे. मूळ कागदपत्रात खाडाखोड करुन बदल केले असल्याची अपीलकर्त्याची तक्रार आहे. त्याचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यातील एकूण २ अपिले अनुक्रमांक १ व २ (अपील क्र.४२५ / सांगली, १०२७ / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.अरुण नामदेव भिसे
मु.पो.मायणी, ता.खटाव, जिल्हा-सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी संचालक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सातारा शाखा सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२५/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | १६.९.०९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
**सहकारी संस्था, सातारा श्री.अरुण पां.काकडे**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी संचालक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सातारा, शाखा सातारा श्री.अे.एस.नलावडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ३.११.०८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | ५.११.०८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, शाखा कुकूडवाड यांचे सन २००१ ते सप्टेंबर २००४ या कालावधीतील शासकीय लेखापरीक्षण व तिमाही पूर्तता अहवालाच्या प्रती.

## विवेचन

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कुकुडवाड शाखेच्या मार्च २००१ ते सप्टेंबर २००४ या काळातील लेखापरीक्षण पूर्तता अहवालाच्या छायांकित प्रतीं मागणी करुनही आपल्याला न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.अरुण नामदेव भिसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.भिसे यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांच्याकडे माहिती मागितली होती. माहिती बँकेच्या स्तरावरील असल्यामुळे अर्ज बँकेकडे वर्ग केला. बँकेने ही माहिती नाकारल्याच्या कारणावरुन श्री.भिसे यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे पुन्हा अर्ज केला. बँकेने सात दिवसात माहिती द्यावी, अशी सूचना जिल्हा उपनिबंधकांनी बॅंकेला दिली. बँकेने ही माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे पाठविली, ती रजिस्टर्ड टपालाने श्री.भिसे यांना पाठविण्यात आली, असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा श्री.अरुण पां. काकडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. आपल्याला माहिती मिळाली असून अपील मागे घेत असल्याचे श्री.भिसे यांनी दि.१२.९.२००९ च्या पत्राद्वारे आयोगाला कळविले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आयोग

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१६.९.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४४८/ सोलापूर | श्री. हणमंत नागनाथ खांडेकर मु. पो.गोटेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, गोटेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती मोहोळ, जि. सोलापूर | २००३ ते २००७ मध्ये ग्रामपंचायत सदस्य यांनी किती खणपट्टी भरली, त्याच्या पावत्या, भरलेल्या रकमेचा वापर कशासाठी करण्यात आला त्याचा जमाखर्च इत्यादी. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याची अपिलकर्त्याची पोच जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गोटेवाडी यांनी दि. ७.९.२००९ रोजीच्या पत्रासोबत आयोगास सादर केली आहे. |
| २ | ८६४/ सोलापूर | श्री. गुलाबहुसेन कासीमसो शेख ६१०/११, उत्तर कसबा, सोलापूर | आस्थापना अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर | उपविभागीय अधिकारी, सोलापूर | साप्ताहिक वर्तमान - पत्रास शिर्षक मिळणेकामी दिलेल्या अर्जाच्या नकला व उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कर्मचा-यांविषयीच्या तक्रारी वरील कार्यवाहीच्या अनुषंगाने तक्रारी एकूण १२ मुद्दे. | आवश्यक कागदपत्रे (मूळ १००/- रू.चा स्टँप ) मिळाल्याची अपीलकर्त्याची पोच जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी दि. ७.८.२००९ रोजीच्या , पत्रासोबत आयोगास सादर केली आहे. |
| ३ | ९७७/ सोलापूर | श्री. दिपक जालिंदर भोसले मु.पो.सरकोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंढरपूर, जि. सोलापूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, जि. सोलापूर | सन २००६ - २००७ या वर्षातील पूरहानी रस्ते, दुरूस्तीबाबत गट अ, ब, क, ड व ई या योजनेअंतर्गत अंदाजपत्रकीय रक्कम, | दि.८.१०.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रानुसार अपीलकर्त्यास दि. १०.१०.२००८ अखेरपर्यंतची माहिती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | टेंडर रक्कम, मक्तेदाराचे नाव, व कामाची स्थिती याबाबतची माहिती. | दि. १०.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्याची रजिस्टर पोस्टाची पोच जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, पंढरपूर यांनी दि. ७.८.२००९ रोजीच्या पत्राने आयोगास सादर केली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. ४४८ / सोलापूर, ८६४ / सोलापूर व ९७७ / सोलापूर ) निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**

**दि.२५.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अनंत मारूती शिंदे
३३, जेधे नगर, बिबवेवाडी, पुणे-३७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (गवनि),
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडई अधिकारी,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. अनंत मारूती शिंदे
३३, जेधे नगर, बिबवेवाडी, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.५.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत यादी जोडली आहे | |

## विवेचन

आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

गलिच्छ वस्ती निर्मूलन योजनेखाली बांधलेल्या वसाहतीतील जागेसंबंधीची माहिती आपल्याला चुकीची दिली जात आहे, केंद्र सरकारच्या धोरणाप्रमाणे भाड्याने दिलेल्या खोल्या रहिवाशांना कायम मालकीने देण्याचा ठराव पुणे महानगरपालिकेने केल्यानंतरही दुरुस्ती व देखभाल महानगरपालिका करत नाही. तेथे बरीच बेकायदेशीर बांधकामे, देशी दारु भट्या, दुकाने झाली आहेत. भाडे भरले असतानाही आपल्याकडून रक्कम वसूल करुन त्रास दिला गेला, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.अनंत मारूती शिंदे यांनी लेखी निवेदनाद्वारे केले.

श्री. शिंदे यांना मागितलेली माहिती पूर्ण देण्यात आली आहे. त्यांच्या अर्जातील बरेच मुद्दे तक्रारीचे अथवा प्रशासकीय कार्यवाहीचे आहेत, त्याचेही उत्तर देण्यात आले आहे. त्यांच्याकडून खोलीचा ताबा घेतल्याने महानगरपालिका अधिकाऱ्यांना त्रास देण्याचा त्यांचा हेतू असल्याचे प्रथम अपिलाच्या निर्णयात अपिलीय प्राधिकाऱ्यांनी म्हटले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात आले आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४६/ २००९ सांगली | श्री. खलील बाबालाल मुल्ला भोई गल्ली, मु.पो.भिलवडी, ता.पलूस, जि.सांगली | मुस्लीम जमात ट्रस्ट, बी २७७, भिलवडी, ता.पलूस, जि. सांगली | प्रभारी अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग, सांगली | मुस्लीम जमात ट्रस्ट संबंधी १) ट्रस्टची सभासद यादी. २) ट्रस्टचे वार्षिक उत्पन्न, व गेल्या पाच वर्षाच्या वार्षिक अहवालाच्या छायाप्रती |
| २ | ४७/ २००९ सांगली | श्री. खलील बाबालाल मुल्ला भोई गल्ली, मु.पो.भिलवडी, ता.पलूस, जि.सांगली | मुस्लीम जमात ट्रस्ट, बी २७७, भिलवडी, ता.पलूस, जि. सांगली | प्रभारी अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग, सांगली | विषयांकित मुस्लीम जमात भिलवडी संबंधी दि. ८/०९/०८ व ७/१०/०८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जानुसार चौकशी किती दिवसात पूर्ण होणे अपेक्षित आहे, चौकशी पुर्ण झाली असल्यास जाब जबाबाच्या प्रती, कारवाई केली असल्यास कारवाई पत्राची प्रत. |

## निष्कर्ष

१. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र. ५२९४/२००८ मध्ये दिलेल्या न्याय निर्णयानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ विश्वस्त न्यासास लागू नाही.

२. विश्वस्त न्यास हा 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरतो हे अपीलकर्त्याने पुराव्यानिशी सिद्ध केले पाहिजे.

३. धर्मादाय आयुक्तांनी नियंत्रक अधिकारी म्हणून त्यांच्या अखत्यारीत येणारी माहिती अपीलकर्त्याने मागितल्यास देणे बंधनकारक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण २ अपिले अनुक्रमांक १ ते २ (अपील क्र.४६ /२००९ / सांगली, ४७ /२००९/ सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २५.०९.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बबन नथुराम नाईक — अपीलकर्ता
स.नं.१५/२/२, चाणक्य नगरी, फ्लॅट नं.४१०,
बी-विंग, कांडगे पार्क, सिंहगड रोड,पुणे-५१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (भू.व्य.) — उत्तरवादी
पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २७.८.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (भू.व्य.)<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सूरज मांढरे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.४.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९६६ पासून १०० फूटी रस्त्याचे आरक्षण असलेल्या जागी आमदार श्री. चंद्रकांत छाजेड यांनी १९९५ साली बेकायदेशीर पेट्रोल पंप बांधल्याबाबत आपण केंद्र सरकारकडे तक्रार केली होती. केंद्राने

महानगरपालिकेच्या नगर विकास विभागाला कळविले. त्यानुसार केलेली कारवाई, आपण तडजोडीने दिलेल्या जागेचा मोबदला व मैला शुध्दीकरण प्रकल्पाला जागा देण्याच्या नावाखाली श्री. छाजेड यांचा पेट्रोल पंप वाचविण्याचा प्रयत्न याबाबत आपण वारंवार माहिती मागूनही दिली जात नाही, म्हणून अपीलकर्ता श्री. बबन नथुराम नाईक यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मैला शुध्दीकरण प्रकल्पासाठी म्हणून आपली जागा घेतली गेली. मैला शुध्दीकरण प्रकल्पाच्या भिंतीलगत ७-८ लोकांना महानगरपालिकेने जागा वापरासाठी दिली. तत्कालीन महानगरपालिका आयुक्त श्री. बेंजामीन व भू-संपादन अधिकारी क्र.१५ श्री. घोरपडे यांनी 'जागा मालकाला पैसे व भाडेकरूंची सोय' करण्याचे वचन दिले होते. मात्र आपल्याला अद्यापही मोबदला दिला गेलेला नाही. या सर्व प्रकरणात मोठा भ्रष्टाचार आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री. नाईक यांनी केले.

श्री. नाईक यांची १८०० चौ.फूट जागा महानगरपालिकेने संपादित केली आहे, या जागेबाबतचा दावा न्यायालयात दाखल आहे. संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. तसेच पेट्रोल पंपासाठी रस्ता सरकविल्याची श्री. नाईक यांची मूळ तक्रार आहे. याबाबतची व त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या निष्कर्षांची सर्व माहिती श्री. नाईक यांना देण्यात आली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी यांनी केले.

या संपूर्ण प्रकरणाबाबतची नेमकी वस्तुस्थिती स्पष्ट करणारा सर्व विभागांचा एकत्रित अहवाल आयोगाला सादर करावा व त्यानुसार श्री. नाईक यांना माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. ४.९.२००८ रोजी व विशेष कार्याधिकारी, भूमिप्रापण-भूसंपादन, पुणे महानगरपालिका यांनी दि. ८.१०.२००८ रोजी श्री. नाईक यांना माहिती दिल्याचा अहवाल आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५ .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री. मिलिंद गणपत कांबळे,
मु.पो.ता. राधानगरी (सो.शिरोली रोड), जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७७+५०९/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १६.९.०९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार राधानगरी,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर श्रीमती प्रियांका गजानन कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २५.८.०८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १०.९.०८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १५.९.०८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | ४.१०.०८ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

शासनाच्या अभिलेख कक्षात मोडी लिप्यंतराचे काम करण्यासाठी शासकीय प्रमाणपत्र असताना देखील जिल्हाधिकारी यांचेकडून परवानगी पत्र आवश्यक असते बाबतच्या आदेशाची प्रत.

## विवेचन

आपल्याकडे मोडी लिपी शिकल्याचे प्रमाणपत्र असूनही लिप्यंतराचे शासकीय काम आपल्याला का दिले जात नाही, या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.मिलिंद गणपत कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा

निवासी नायब तहसीलदार, राधानगरी यांच्याकडे मागितलेली माहिती योग्य मिळाली नाही, या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

श्री.कांबळे यांनी मागितलेल्या माहितीबाबत त्यांना विहित मुदतीत उत्तर देण्यात आले. मोडी लिप्यंतरासाठी शासनाची परवानगी असलेल्यांची पत्राची प्रत छायांकित प्रतीवरुन साक्षांकित प्रत देता येत नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी नाकारली. विहित मुदतीपेक्षा विलंब झाल्याच्या कारणावरुन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, राधानगरी यांनी अपील नाकारले. मात्र लिप्यंतराची श्री.हुसैन यांना परवानगी देणाऱ्या पत्राची प्रत श्री.कांबळे याना द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना दिले त्यानुसार ती प्रत श्री.कांबळे यांना देण्यात आली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती प्रियांका गजानन कांबळे यांनी संबंधित कागदपत्रांच्या पूरक प्रतींसह नमूद केले.

आपण याच संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे अनेक अर्ज केले होते. माहितीच्या अधिकारातील अर्जही केला, परंतु लिप्यंतराचे काम देण्याबाबत शासनाचे स्पष्ट आदेश नसल्याने परवानगी देता येत नसल्याचे उपजिल्हाधिकाऱ्यांनी आपल्याला कळविले, असे श्री.कांबळे यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. आपल्याला लिप्यंतराचे काम का दिले जात नाही, हा श्री.कांबळे यांचा मुख्य प्रश्न आहे. अशा स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. परंतु लोकशाही दिनात श्री.कांबळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने परवानगी मागणीचा अर्ज राधानगरी तहसील कार्यालयाकडे केल्यास तसा प्रस्ताव पाठविण्यात येईल, असेही श्री.कांबळे यांना सांगण्यात आले होते, परंतु त्यानुसार त्यांनी अर्ज केला नाही, असेही श्रीमती प्रियांका कांबळे यांनी नमूद केले.

उपरोक्त बाबी लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. १६ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.लक्ष्मण कृष्णा पोवार
७/४२, वडर गल्ली, जनता बँकेजवळ,
आयडीबीआय बँक रोड, इचलकरंजी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सह. परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, परिवहन आयुक्त कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** उप परिवहन आयुक्त, प्रशासन,
महाराष्ट्र राज्य, परिवहन आयुक्त कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८८/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १६.९.०९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सह. परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, परिवहन आयुक्त कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई श्री.स.बा.सहस्त्रबुध्दे

**जन माहिती अधिकारी तथा** उप परिवहन आयुक्त, प्रशासन,
महाराष्ट्र राज्य, परिवहन आयुक्त कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई श्री.एस.के.पाचरणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २.६.०८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | ३.७.०८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ९.७.०८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १२.८.०८ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

अर्जदाराच्या लिपिक-टंकलेखक लेखी परिक्षेच्या उत्तर पत्रिकेची झेरॉक्स व गुण, तसेच अर्जदारापेक्षा वि.जा.(अ) या प्रवर्गात कमी गुण मिळालेल्या १० उमेदवारांची नावे व त्यांचे गुण आणि जादा गुण मिळालेल्या सर्वांचा गुण तक्ता व त्यांच्या नावाची यादी.

## विवेचन

परिवहन आयुक्तालयाने घेतलेल्या लिपीक-टंकलेखक परीक्षेतील आपल्या उत्तरपत्रिकेची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही. आपण पुणे विभागातील उमेदवारांची नावे व त्यांचे गुण यांची यादी मागितली असताना कोल्हापूर विभागातील माहिती दिली. नियुक्तीबाबत आपल्यावर अन्याय झाला, अशा कारणावरुन अपीलकर्ता श्री.लक्ष्मण कृष्णा पोवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.पोवार यांनी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी तथा उपपरिवहन आयुक्त(प्रशासन) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित मुदतीत उत्तर दिले. श्री.पोवार यांच्या अर्जात कोणत्या विभागाची यादी हवी हे स्पष्ट केलेले नव्हते. त्यामुळे त्यांना कोल्हापूर विभागाची यादी देण्यात आली होती. त्यांनी केलेल्या अपिलात त्यांना हवी असलेली पुणे विभागाची यादी देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी म्हणून आपण दिला. उत्तरपत्रिका गोपनीय असल्याचा निर्णय राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी पूर्वी एका प्रकरणात दिलेला असल्यामुळे त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तरपत्रिकेची प्रत देणे नाकारले. अपिलाच्या सुनावणीच्या वेळी श्री.पोवार यांनी आणखी काही माहिती मागणारा अर्ज सादर केला. त्यानुसार आठ दिवसात जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी असा आदेश आपण दिला, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहपरिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री.स.बा.सहस्त्रबुध्दे यांनी पूरक कागदपत्रांच्या प्रतींसह केले.

नियुक्तीचे पत्र द्यावे, निवड न केल्याची कारणे द्यावीत, अशी मागणी श्री.पोवार यांनी केली होती, ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नसल्याचे त्यांना कळविण्यात आले होते. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार श्री.पोवार यांनी नंतर मागितलेली माहितीही त्यांना देण्यात आली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपपरिवहन आयुक्त (प्रशासन) श्री.एस.के.पाचरणे यांनी नमूद केले.

श्री.पोवार यांनी मूळ अर्जापेक्षा प्रथम अपिलात व त्या व्यतिरिक्त राज्य माहिती आयोगाकडील अपिलात अशी प्रत्येक वेळी वेगवेगळी माहिती मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील विहित प्रक्रियेशी हे सुसंगत नाही. तसेच नियुक्ती देऊन आपल्यावरील अन्याय दूर करावा, ही मागणी 'माहिती'

ठरत नाही. मात्र स्वतःच्या उत्तरपत्रिकेची उमेदवाराने मागितलेली छायांकित प्रत गोपनीय मानता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील पारदर्शकतेच्या तत्त्वाशी ते विसंगत ठरेल. म्हणून अपीलकर्त्याला त्याच्या उत्तरपत्रिकेची प्रत दिली जाणे आवश्यक आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्त्यास मूळ अर्जानुसार मागितलेली त्याच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी तथा उपपरिवहन आयुक्त (प्रशासन) श्री.एस.के.पाचरणे यांनी एक आठवड्यात पाठवावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.संभाजीराव दिनकरराव सावंत
प्लॉट नं ३७, वसंत कॉलनी , दिप एन्टरप्राझेस जवळ,
सांगली - ४१६ ४१६

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १५-०९-२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.संभाजीराव दिनकरराव सावंत
प्लॉट नं ३७, वसंत कॉलनी , दिप एन्टरप्राझेस जवळ, सांगली - ४१६ ४१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका,
जि.सांगली प्रतिनिधी श्री. वाय.बी. माळी, अतिरिक्त आयुक्त

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, जि. सांगली श्री. जे. व्ही. नाईक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ०४-०८-०७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २१-११-२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ०१-१०-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशितांना आपल्या महानगरपालिकेमध्ये वर्ग ३ व वर्ग ४ च्या पदावर किती जणांना नोकऱ्या दिल्या, सदर उमेदवारांची नावे, पत्ते व नियुक्तीचा विभाग, तसेच महापालिकेत किती जागा रिक्त आहेत याची विभागवार माहिती

## विवेचन

स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशितांना सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिकेमध्ये दिलेल्या नोकऱ्यां-बाबतच्या माहिती प्रारंभी मिळाली नाही व नंतर अपूर्ण माहिती दिली, म्हणून अपीलकर्ता श्री. संभाजीराव दिनकरराव सावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

माहितीशी संबंधित लिपिक श्री. व्ही.एन.मोरे यांनी माहिती विलंबाने दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसारही ते माहिती देत नाहीत व अपमानास्पद वागणूक देतात, असे प्रतिपादन श्री. सावंत यांनी दि. २२.१०.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व आयोगापुढील सुनावणीत केले.

श्री. सावंत वेळोवेळी वेगवेगळ्या प्रकारची माहिती मोठ्या प्रमाणावर मागत असतात. त्या त्या वेळी त्यांना ती दिली जाते, या अर्जाबाबतही त्यांना माहिती देण्यात आली. प्रथम अर्जास उत्तर देण्यास विलंब झाला, मात्र अपिलातील निर्णयानंतर पाठविलेली माहिती त्यांनी स्वीकारली नाही, म्हणून टपालाने पाठविली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रतिपादन केले.

श्री. सावंत यांचा मूळ अर्ज दि. ४.८.२००७ चा असून जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. २१.११.२००७ रोजी उत्तर दिले आहे. या विलंबास जबाबदार कोण आहे व विलंबाची कारणे काय आहेत, तसेच लिपिक श्री. मोरे यांच्या संबंधातील श्री. सावंत यांच्या तक्रारी बाबतची वस्तुस्थिती काय आहे, याचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि. सांगली यांनी करणे आवश्यक आहे. श्री. सावंत यांना माहिती देण्यात आली असून ती न स्वीकारण्याची त्यांची कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. सावंत यांना माहिती देण्यास झालेल्या विलंबास जबाबदार कोण व त्यांना शास्ती का करू नये, याबाबतचा अहवाल संबंधितांच्या खुलाशासह अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि. सांगली यांनी दि. २७.९.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ०५-०२-२००९ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५१०/ सातारा | श्री. अरविंद भगवान जाधव मु.पो.सुर्ली, ता.कोरेगांव, जि.सातारा | कार्यकारी संचालक, सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि. यशवंतनगर, ता.कराड, जि.सातारा | प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, | सभासद कोड नं.११०२१०२९१ हे सभासद कोणत्या साली झाले याचा तपशील व मयत सभासद कोड नं. ११०२१०२५९ यांचे वारस व शेअर्स सर्टिफिकेट इ. माहिती मिळावी. | अर्जदाराचे मागणी प्रमाणे १ महिन्याच्या मुदतीत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

(१) अपील क्र. ५१०/सातारा निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री. अरविंद भगवान जाधव यांच्या माहिती अर्जातील मागणी प्रमाणे १ महिन्यात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक ५/२/२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमातील' प्रपत्रात नमूद केले आहे. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी आयोगास तातडीने सादर करावा, अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८-०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. धनराज शोभाचंद साखरिया
तर्फे ॲड. जे.आर. विजापुरे
रा. ए-११, महिम्न सोसायटी, भाग्यश्री इमारत, ... अपीलकर्ता
कर्वेनगर, पुणे-५२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, कर आकारणी
व करसंकलन प्रमुख,पुणे महानगरपालिका, पुणे ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक कर आकारणी व
करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१४/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. धनराज शोभाचंद साखरिया
तर्फे ॲड. जे.आर. विजापुरे
रा. ए-११, महिम्न सोसायटी, भाग्यश्री इमारत, कर्वेनगर, पुणे-५२

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, कर आकारणी
व करसंकलन प्रमुख,पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. विलास कानडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक कर आकारणी व
करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. रामदास बापू जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.४.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.५.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे येथील प्लॉट नं. ४७ व ४८, सर्व्हे नंबर ७०६अ + ब या मिळकतीच्या संदर्भात कर आकारणी कशी केली, नोटीस काढली असल्यास कोणाच्या नावे काढली त्याची सत्य प्रत, आयुक्तांनी सुनावणी घेतली असल्यास त्याची संपूर्ण माहिती, मुंबई प्रांतिक अधिनियम, १९४९ च्या चॅप्टर १ ते २० पर्यंत कारवाई केली असल्यास त्याची माहिती, तसेच ए फॉर्मची प्रत | |

## विवेचन

मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे येथील मिळकतीबाबत ज्या धोरणानुसार कर आकारणी केली त्याची सत्य प्रत व कार्यालयीन परिपत्रकाची सत्यप्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही, ती पंधरा दिवसात देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिल्यानंतरही अशा प्रकारची नेमकी माहिती मिळाली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री. धनराज शोभाचंद साखरिया यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

६ पैकी ५ मुदयांची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत दिली. परिपत्रकाची प्रत अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर सन २००२ चे धोरण म्हणून दिली, परंतु परिपत्रक सन २००१ चे आहे, ते चुकीचे आहे. यावरुन माहिती चुकीची आहे, त्या परिपत्रकात खाडाखोड केली आहे, असे प्रतिपादन्न अपीलकर्ता श्री. साखरिया यांनी केले.

माहिती लपविण्याचा वा खोटी माहिती देण्याचा कोणताही उद्देश नाही. प्रामुख्याने मोकळ्या जागेच्या कर आकारणी संदर्भात श्री. साखरिया यांच्या वतीने माहिती मागण्यात आली होती. सर्वात अलीकडचे परिपत्रक सन २००१ चे असल्यामुळे ते देण्यात आले. या व्यतिरिक्त कोणतेही वेगळे परिपत्रक नाही, असे अपीलकर्त्याला वेळोवेळी स्पष्ट करण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. रामदास बापू जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री. विलास कानडे यांनी केले.

अधिका-यांनी दिलेल्या माहितीमध्ये दुष्ट हेतूने चुकीच्या मार्गाने फेरबदल करुन चुकीची कागदपत्र दिली, तसेच चुकीची कर आकारणी केली, असे प्रतिपादन श्री. साखरिया यांचे वतीने ॲड. जयराज रामचंद्र विजापुरे यांनी केले.

संदर्भित परिपत्रकाची प्रत व कर आकारणीच्या अनुषंगाने स्पष्टीकरणात्मक पूरक माहिती अपीलकर्त्यास दोन दिवसांत द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. परंतु आठ दिवसांनी कागदपत्रे दिली गेली व मोकळी जागा खरेदीदार स्वत: वापरत असेल तर त्याला १२० प्रति चौ.फुटाप्रमणे करआकारणी करण्याच्या तरतुदीचा कागदपत्रात उल्लेख नाही, असे निवेदन ॲड. विजापुरे यांनी दि. ९.९.२००९ रोजी आयोगाला सादर केले. मात्र जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.१३.८.२००९ च्या पत्रान्वये संबंधित प्रती व करआकारणी बाबतचे स्पष्टीकरण आयोगाला सादर केले असून त्याची प्रत श्री. साखरिया यांना पाठविली असल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते. अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रारंभीच्या उत्तरात परिपत्रकाची प्रत दिली नव्हती, ती द्यावयास हवी होती. परंतु ती हेतूत: नाकारल्याचे दिसत नाही. तसेच माहिती दुष्ट हेतूने वा खोटी दिल्याचे सिध्द होत नाही. केलेली करआकारणी चुकीची आहे, असे अपीलकर्त्यास वाटत असल्यास ती तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५ .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. संदिप विठ्ठल जगताप
१/१, जिव्हाळा, सोसायटी, बॉम्बे रेस्टॉरंट पाठीमागे,
जुना एम.आय.डी.सी रोड, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कुलगुरु, टिळक महाराष्ट्र (अभिमत) विद्यापीठ,
विद्यापीठ भवन, मुकुंदनगर, पुणे

**जन माहिती अधिकारी** टिळक महाराष्ट्र (अभिमत) विद्यापीठ,
विद्यापीठ भवन, मुकुंदनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | १७.९.०९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संदिप विठ्ठल जगताप
१/१, जिव्हाळा, सोसायटी, बॉम्बे रेस्टॉरंट पाठीमागे,
जुना एम.आय.डी.सी रोड, सातारा

**जन माहिती अधिकारी** टिळक महाराष्ट्र (अभिमत) विद्यापीठ,
विद्यापीठ भवन, मुकुंदनगर, पुणे श्रीमती वीणा कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १८.७.०८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १८.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | २५.८.०८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | ४.१०.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**
सोबत प्रत जोडली आहे.

## विवचन

टिळक महाराष्ट्र (अभिमत) विद्यापीठाने दि.१ जानेवारी २००४ ते दि.१ ऑगस्ट २००८ या काळात विविध अभयासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची नावे, कायम नोंदणी क्रमांक, केंद्र सरकार; विद्यापीठ अनुदान मंडळ आदींची आवश्यकतेनुसार घेतलेली परवानगी आदी माहिती जन माहिती अधिकारी, टिळक महाराष्ट्र (अभिमत) विद्यापीठ, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्ण माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु, टिळक महाराष्ट्र (अभिमत) विद्यापीठ, पुणे यांच्यापुढे प्रथम अपिलाची सुनावणी झाली, त्यावेळी माहिती देण्यासाठी एक महिन्याची मुदत जन माहिती अधिकाऱ्यांनी मागितली, परंतु या मुदतीतही आपल्याला सर्व माहिती मिळाली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री.संदिप विठ्ठल जगताप यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अनेक विद्यापीठे योग्य त्या परवानगीशिवाय अनेक अभ्यासक्रम चालवितात, विद्यार्थ्यांना पदव्या देतात, जर या पदव्या मान्यताप्राप्त नसतील तर या विद्यार्थ्यांचे भवितव्य काय, हा लाखो विद्यार्थ्यांच्या हिताशी निगडीत प्रश्न आहे. या संबंधात आपण जनहित याचिका दाखल करणार असून त्यासाठी ही माहिती मिळणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या अभ्यासक्रमांना प्रवेश व पदव्या दिलेल्या विद्यार्थ्यांची नावे व अभ्यासक्रम, अशा अभ्यासक्रमांना अधिकृत मान्यता असलेली पत्रे व विद्यापीठातर्फे विविध ठिकाणी चालविल्या जाणाऱ्या केंद्रांचे पत्ते ही माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन श्री.जगताप यांनी केले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला काही अभ्यासक्रमांची परवानगी दिली नसल्याचे विद्यापीठ अनुदान मंडळाकडून आपल्याला मिळालेल्या माहितीत म्हटले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

मागितलेली माहिती चार वर्षांमधील व सुमारे २२ ते २३ हजार विद्यार्थ्यांची आहे. विद्यापीठात केवळ ५२ शिक्षकेतर कर्मचारी असून त्यांच्याकडून मर्यादित वेळेत एवढी माहिती देणे शक्य नाही. यासाठी लागणारा कर्मचारीवर्ग लक्षात घेता तीन ते चार लाख रुपये खर्च व तीन ते चार महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लागेल. अपीलकर्ता हा खर्च देण्यास तयार असल्यास त्यांना माहिती देण्यास आम्ही तयार आहोत, असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु, टिळक महाराष्ट्र (अभिमत) विद्यापीठ, पुणे डॉ.दीपक ज. टिळक यांनी दि.५.२.२००९ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. तसेच कायम नोंदणी क्रमांक इ. माहिती दिल्यास विद्यार्थ्यांच्या खोट्या गुणपत्रिका, खोटी प्रमाणपत्रे तयार होण्याची शक्यता असून अशा प्रकारची काही प्रकरणे विद्यापीठाला हाताळावी लागत आहेत, असेही डॉ.टिळक यांनी त्या निवेदनात म्हटले

आहे. त्याचाच पुनरुच्चार जन माहिती अधिकारी श्रीमती वीणा कुलकर्णी यांनी आयोगापुढील सुनावणीत केला. आपण भ्रष्टाचारविरोधी जन आंदोलन न्यासाचे सातारा जिल्ह्याचे प्रभारी सचिव असून या माहितीचा व कायद्याचा दुरुपयोग होणार नाही, असे श्री.जगताप यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्री.जगताप यांनी मागितलेली माहिती विस्तृत आहे, हे मान्य केले. मात्र त्यासाठी येणारा खर्च देण्यास आपली तयारी आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

संबंधित माहिती विद्यार्थ्यांशी निगडीत असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार गोपनीय ठरत नाही, मात्र डॉ.टिळक यांनी निवेदनात उल्लेख केलेल्या गैरवापराचा धोका लक्षात घेता विद्यार्थ्यांचा कायम नोंदणी क्रमांक व त्या स्वरुपाचा तपशील नाकारणे योग्य आहे. माहितीचे विस्तृत स्वरुप लक्षात घेता विद्यार्थ्यांची नावे व अभ्यासक्रम / दिलेली पदवी ही माहिती अपीलकर्त्यास अवलोकन करु द्यावी व त्यांनी अभिलेखाच्या अवलोकनानंतर मागितलेली माहिती योग्य ते शुल्क आकारुन देण्यात यावी, अशी कार्यपध्दती अवलंबिली पाहिजे.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) टिळक महाराष्ट्र (अभिमत) विद्यापीठाने विद्यार्थ्यांची नावे, प्रवेश दिलेला अभ्यासक्रम / पदवी यासह अपीलकर्ता श्री.संदीप विठ्ठल जगताप यांना द्यावी. त्यासाठी श्री.जगताप यांना अभिलेखाचे अवलोकन करु द्यावे व त्यातून त्याना अपेक्षित असलेली माहिती द्यावी, मात्र विद्यार्थ्यांचा कायम नोंदणी क्रमांक, पत्ते, गुणपत्रिका याचा द्यावयाच्या माहितीत समावेश असणार नाही. तसेच वेबसाईटवर विद्यापीठाने जाहीर केलेल्या माहितीचाही त्यात समावेश असणार नाही.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीच अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.जितेंद्र वसंत घाडगे
४३/३, पारेख ईस्टेट बिल्डिंग, केनेडी ब्रिज, ऑपेरा हाऊस, मुंबई-४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार खटाव,
ता.खटाव, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार खटाव, उत्तरवादी
ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२३/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जितेंद्र वसंत घाडगे
४३/३, पारेख ईस्टेट बिल्डींग, केनडी ब्रिज, ऑपेरा हाऊस, मुंबई-४

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.८.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१९.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.१०.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

श्रीमती उषा घाडगे यांनी तहसील कार्यालय खटाव यांचेकडे दि. १/२/२००७ रोजी अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने, तहसीलदार यांचें नांव व रुजू झाल्याची तारीख, अर्जावर तहसील कार्यालयाकडून केलेली कार्यवाही, सातबारावरुन इतर हक्कातील नावे कमी करण्याची पध्दती काय आहे, कोणत्या तारखेला अर्ज कार्यवाहीसाठी पाठविला व त्या अर्जावर कार्यवाही केलेल्या अधिकाऱ्याचे नाव, जावक नंबर, इतर हक्कात ज्या अधिकाऱ्याने नावे लावली त्याचे नाव व कोणत्या कलमानुसार लावली त्याची माहिती

## विवेचन

आपली आई श्रीमती उषा घाडगे यांनी ७/१२ वरील इतर हक्कातील नावे कमी करण्याबाबत दि.१.२.२००७ रोजी केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची आपण मागितलेली माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.जितेंद्र वसंत घाडगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. मूळ अर्जातील कागदपत्रे अपुरी असल्याने पुराव्याचे कागदपत्र जोडून मर्जीतर फेरअर्ज करावा, असा निर्णय यापूर्वीच कळविण्यात आला असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून यांनी प्रपत्रात नमूद केले. दि.२६.१०.२००७ च्या अर्जाला दि.८.११.२००७ रोजी उत्तर पाठविल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.एच.खाडे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.बी.एस.मोहिते यांनी आपल्याला सांगितले व प्रपत्रात नमूद केले, परंतु तसे पत्र आपल्याला मिळालेले नाही. पाचपैकी चार मुद्दयांची माहिती एक महिन्यात देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी मान्य केले असल्याचे अपीलकर्ता श्री.घाडगे यांनी प्रपत्रात नोंदविले. त्यानंतरही आपल्याला योग्य माहिती न मिळाल्याची तक्रार श्री.घाडगे यांनी आयोगाकडे केली, त्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपण दि.२५.१०.२००७ रोजी अर्ज केला. परंतु पाच महिने कोणतेही उत्तर दिले गेले नाही, असे श्री.घाडगे यांनी नमूद केले. दि.५.२.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नंतर दि.१२.२.२००९ रोजी आपल्याला काही माहिती पाठविण्यात आली. परंतु आपल्या आईच्या अर्जावर कोणी चौकशी केली, इतर हक्कात नावे कोणत्या अधिकाऱ्याने नोंदविली व ती नावे वगळली गेली असल्यास अद्ययावत ७/१२ उतारा मिळण्यासाठी काय केले पाहिजे, याची माहिती आपल्याला दिली गेली नाही. आपण फेरअर्ज केला. परंतु त्याचे उत्तर आपल्याला न पाठविता तलाठ्याकडे पाठविले गेले व तलाठ्याने ते आपल्या विरोधी गटाला दिले, मागूनही आपल्याला त्याची प्रत मिळत नाही, असे प्रतिपादन श्री.घाडगे यांनी केले.

तहसीलदारांकडे प्रथम अपील केले नसल्याचे विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.व्ही.के.गडांकुश यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र आपण अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील केले. त्यांनी ते फेटाळण्याऐवजी तहसीलदारांकडे पाठवावयास हवे होते, असे श्री.घाडगे यांनी लेखी व तोंडी निवेदनात म्हटले आहे. स्वतः योग्य

त्या अधिकाऱ्याकडे अर्ज न करता, अधिकाऱ्यांनी योग्यतेनुसार बटवडा करावा, ही अपीलकर्त्याची अपेक्षा अवाजवी आहे. तहसीलदारांकडे अपील केले पाहिजे, हे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

सुनावणीची नोटीस न मिळाल्यामुळे आपण सुनावणीस उपस्थित नसल्याचे जन माहिती अधिकारी श्री.बी.एस.मोहिते यांनी दूरध्वनीवरील विचारणेनंतर सांगितले. मात्र माहिती देण्याबाबतच्या कार्यवाहीचा पुराव्यानिशी अहवाल दोन दिवसात सादर करण्याचा आदेश आयोगाने अपिलीय प्राधिकाऱ्यांना दिला. त्युनसार विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.प्रभाकर सदाशिव भगत यांनी आयोगाला अहवाल सादर केला.

श्री.घाडगे यांच्या मूळ अर्जाला दि.८.११.२००७ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उत्तर पाठविल्याचा जावक बारनिशीतील नोंदीसह पुरावा पत्राच्या प्रतीसह त्यांनी सादर केला. श्री.घाडगे यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. श्रीमती उषा वसंत घाडगे यांच्या मूळ अर्जावर उत्तर देऊन फेरअर्जावरही आवश्यक कार्यवाहीचा निर्णय त्यांना दि.१९.५.२००९ च्या पत्रान्वये त्यांना कळविण्यात आला असल्याचे श्री.भगत यांनी संबंधित नोंदींसह सादर केले. श्रीमती घाडगे यांच्या अर्जावर कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पदांची माहिती देण्यात आली आहे, नावांचा तपशील दिलेला नाही, तो त्यांना त्वरित कळविण्यात येईल, असे श्री.भगत यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) श्रीमती उषा वसंत घाडगे यांच्या मूळ अर्जावर कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावांचा स्पष्ट उल्लेख असलेले पत्र अपिलीय प्राधिकारी श्री.भगत यांनी अपीलकर्ता श्री.जितेंद्र घाडगे यांना पाठवून दि.३०.९.२००९ पर्यंत आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.९.२००९